वाईट नोंदी आणि वाईट अंतःकरण

लेखक - ॲल्बर्ट एन मार्टिन

अनुवाद - क्रॉसी उर्टेकर

अनुक्रमणिका **पृष्ठ**

१. समस्या, समस्या, समस्या	३
२. वाईट नोंदी	४
३. वाईट अंतःकरण	७
४. स्वच्छ नोंदी व बदललेले अंतःकरण	९
५. समस्या सोडवणे	११

वाईट नोंदी आणि वाईट अंत:करण

अनुवाद: क्रॉसी उर्टेकर

पहिली मराठी आवृत्ती: २०१७

© Copyright 1998 Chapel Library. Printed in the USA. Permission is expressly granted to reproduce this material by any means, provided

1. You do not charge beyond a nominal sum for cost of duplication;
2. This copyright notice and all the text on this page are included.

Chapel Library is a faith ministry that relies entirely upon God's faithfulness. We therefore do not solicit donations, but we gratefully receive support from those who freely desire to give. Chapel Library does not necessarily agree with all the doctrinal positions of the authors it publishes.

Worldwide, please download material without charge from our website, or contact the international distributor as listed there for your country.

In **North America**, for additional copies of this booklet or other Christ-centered materials from prior centuries, please contact

CHAPEL LIBRARY
2603 West Wright Street Pensacola, Florida 32505 USA
Phone: (850) 438-6666 • Fax: (850) 438-0227
chapel@mountzion.org www.ChapelLibrary.org

Translated and Published by Love Maharashtra with permission from Chapel Library USA

लव्ह महाराष्ट्र

१७७२ भीमपुरा गल्ली क्र. २३, बाबाजान चौक, पुणे – ४११००१. महाराष्ट्र

दुरध्वनी: ०२०-२६३४०५५३

ईमेल: lovemaharashtra@gmail.com

वेबसाईट: lovemaharashtra.org

वाईट नोंदी आणि वाईट अंत:करण

समस्या, समस्या, समस्या!

पुष्कळदा असे वाटते की या जगातील जीवन म्हणजे एका समस्येमागून दुसरी समस्या याशिवाय दुसरे काही नाही. आपल्याला निरनिराळ्या प्रकारच्या समस्या असतात — कौटुंबिक समस्या, आर्थिक समस्या, आरोग्याच्या समस्या, कामाच्या समस्या — पण आपल्याला सर्वांना समस्या असतातच. आपण सर्वच या समस्या सोडवण्याच्या प्रयत्नात असतो. कौटुंबिक समस्यांसाठी आपण सल्लागार शोधतो, आर्थिक समस्या असेल तर दुसरी नोकरी पाहातो, आरोग्यासाठी आपण डॉक्टरकडे जातो, पण आपली परिस्थिती सुधारण्यासाठी आपण करता येईल ते सर्व करत असतो.

पण एक अशी समस्या आहे की ती आपल्या या सर्व समस्यांहून मोठी आहे. आणि ती सोडवण्यात अपयशी ठरणे म्हणजे दारिद्र्य किंवा काबाडकष्टांपेक्षा अधिक गंभीर शोकांतिका घडणे. तरीही बहुसंख्य मानवजातीने या समस्येबाबत मुळीच काहीच केलेले नाही.

ही *वाईट नोंदी व वाईट अंत:करण* अशी दुहेरी समस्या आहे. देवाने हे जाहीर केले आहे की प्रत्येक स्त्री, पुरुष, मुलगा, मुलगी यांना ही समस्या आहे.

तुमच्या कौटुंबिक, आर्थिक आणि आरोग्याच्या समस्यांवर मात करण्याचे तुमचे प्रयत्न तर महत्त्वाचे आहेतच, पण देवाच्या कोर्टाच्या दरबारी तुमच्या वाईट नोंदी रद्द केल्या जाणे व तुमच्या अंत:करणाची भ्रष्टता बदलण्याचा मार्ग शोधणे, त्याहून महत्त्वाचे आहे, आणि तुमच्या इतर समस्यांवरही मात करण्यासाठी मूलत: अत्यावश्यक आहे. अखेर तुम्ही जर तुमच्या वाईट नोंदी व वाईट अंत:करणाच्या समस्येशी सामना केला नाही व त्यावर उपाय शोधला नाही *तर तुम्ही जन्मला नसता तर ते तुमच्यासाठी बरे होते* (मार्क १४:२१).

तुमच्या सध्याच्या व सार्वकालिक कल्याणाच्या चिंतेमुळे तुमच्या या महान समस्येचे स्वरूप तुम्ही लक्षात घ्या. यासाठी की तुम्हाला त्यावरील

एकमेव उपाय सापडावा.

वाईट नोंदी

अर्थात देवाने स्वत: त्याच्या कृपेने पुसून टाकेपर्यंत या भूतलावरील प्रत्येक मानवाच्या स्वर्गातील नोंदी वाईटच आहेत. देवाने स्वत: म्हटले आहे की "ते सर्व पापवश आहेत" आणि "नीतिमान कोणी नाही, एकदेखील नाही" (रोम. ३:९,१०).

सर्व प्राणिमात्र देवाची निर्मिती असल्याने आपण देवाला जबाबदार आहोत. उदाहरणार्थ, गरुत्वाकर्षणासारख्या दृश्य विश्वाला नियंत्रणात ठेवणाऱ्या देवाच्या निसर्गनियमांच्याच केवळ आपण अधीन नसून त्याच्या नैतिक नियमांच्याही आपण अधीन आहोत. त्याची प्रजा होणे ही आपली निवड नाही, म्हणून आपले त्याला जबाबदार राहणे बदलत नाही. तो निर्माता देव आहे आणि आपण त्याचे प्राणिमात्र आहोत.

जसे आपण आपल्या देशाला जबाबदार आहोत तसेच आपण आपल्या देवाला जबाबदार आहोत. तुमचा जन्म होताच तुमच्या मातृभूमीच्या नियमांच्या तुम्ही अधीन होता. मग तुम्ही कर भरायला नकार दिला, किंवा कोणाच्या मालमत्तेवर शिक्कामोर्तब केले, किंवा कोणावर हल्ला केला असता तुम्हाला पकडले तर तुमच्या गुन्हेगारीच्या कृत्याबद्दल तुम्हाला जबाबदार धरण्यात येते. नागरी यंत्रणा तुमची कशी चौकशी होईल ते पाहते, शिक्षा ठोठावते व त्यानुसार सजा देते. मला तुमचे नियम मान्य नाहीत अशी तक्रार करून तुम्ही आपण गुन्हा केल्याचे धुडकावून लावू शकत नाही. मूळ मुद्दा तुम्ही किंवा तुमच्या भावना त्या भूमीच्या नियमांशी सहमत आहेत की नाही हा नसून ज्या अधिकाराच्या तुम्ही अधीन आहात त्याला तुम्ही जबाबदार आहात हा आहे.

आता या वास्तवाला तुम्ही सामोरे जा की तुम्ही देवाने निर्मिलेले प्राणिमात्र आहात आणि देवाला जबाबदार आहात. पण हे देखील वास्तव आहे की तुम्ही देवाविरुद्ध पाप केले आहे, आणि देवाने तुमचा न्याय करून तुम्हाला सार्वकालिक शिक्षेस पात्र ठरवले आहे. हा तुमच्या महान समस्येचा एक भाग झाला: तुमच्या देवासमोर वाईट नोंदी आहेत. कायदेशीरपणे त्या पुसल्या गेल्या नाहीत तर न्यायाच्या दिवशी या नोंदींवरून देव तुम्हाला दोषी ठरवील.

ज्या देवाने तुम्हाला निर्माण केले व ज्याला तुम्ही जबाबदार आहात तो तुम्हाला आंतरबाह्य सर्वस्वी चांगलाच ओळखतो. बायबल शिकवते की "त्याच्या दृष्टीला अदृश्य अशी कोणतीही निर्मिती नाही: ज्याच्याबरोबर आपला संबंध आहे त्याच्या दृष्टीला सर्व उघडे व प्रकट केलेले आहे" (इब्री ४:१३). तुमची सर्व कृती देव पाहतो. मग ती सर्वांसमक्ष केलेली असो की गुप्तपणे केलेली असो. "परमेश्वराचे नेत्र सर्वत्र आहेत, ते बरेवाईट पाहत असतात" (नीति. १५:३).

हाच देव त्याच्या नैतिक नियमांपासून केलेल्या प्रत्येक मार्गभ्रष्टतेची काळजीपूर्वक नोंद ठेवतो. विचार, शब्द, वृत्ती व कृतीने केलेल्या प्रत्येक नैतिक मार्गभ्रष्टतेची तो नोंद घेतो. आणि देवाचे वचन सांगते की न्यायाच्या दिवशी या नोंदवह्या उघडण्यात येतील — आणि त्यात जे लिहिले आहे त्यानुसार तुमचा न्याय करण्यात येईल. "नंतर मोठे पांढरे राजासन व त्यावर बसलेला एक जण माझ्या दृष्टीस पडला, त्याच्या तोंडापुढून पृथ्वी व आकाश ही पळाली; त्यांकरता ठिकाण उरले नाही. मग मृत झालेल्या लहान थोरांना मी राजासनापुढे उभे राहिलेले पाहिले. त्यावेळी पुस्तके उघडली गेली; तेव्हा दुसरे एक पुस्तक उघडले गेले ते जीवनाचे होते; आणि त्या पुस्तकामध्ये जे लिहिले होते त्यावरून मृतांचा न्याय ज्यांच्या त्यांच्या कृत्यांवरून ठरविण्यात आला. तेव्हा समुद्राने आपल्यामधील मृत मनुष्यांस बाहेर सोडले; मृत्यू व अधोलोक हयांनी आपल्यातील मृतमनुष्यांस बाहेर सोडले; आणि ज्यांच्या त्यांच्या कृत्यांप्रमाणे प्रत्येकाचा न्याय ठरविण्यात आला. तेव्हा मरण व अधोलोक ही अग्निच्या सरोवरात टाकली गेली. अग्निचे सरोवर हे दुसरे मरण होय. ज्या कोणाचे नाव जीवनाच्या पुस्तकात लिहिलेले सापडले नाही, तो अग्निच्या सरोवरात टाकला गेला" (प्रकटी २०:११-१५). तुमच्या पापाविषयी देवाला असलेली माहिती आणि त्यासाठी तुमचा न्याय करण्याविषयीचा त्याचा निर्धार पाहून तुमचा थरकाप होत नाही का?

देव व देवाच्या नियमाविरुद्ध तुम्ही केलेल्या पापांची लांबी, रुंदी, खोली या व्याप्तीचा विचार करा. दहा आज्ञांमध्ये तुम्ही त्याच्यावर आपल्या सर्वस्वाने प्रीती करण्याची त्याने आज्ञा दिली आहे. त्याच्यासमोर अन्य देव नसावेत, आणि मानवी कल्पनांप्रमाणे नव्हे तर त्याने प्रकट केलेल्या इच्छेनुसार त्याची उपासना व सेवा करावी, त्याचे नाम व वचन पवित्र मानावे, कामापासून विसावा घेऊन त्याने नेमून

दिलेला दिवस उपासनेसाठी निराळा काढून ठेवावा, त्याने नेमून दिलेल्या शासनव्यवस्थेचा आदरसन्मान करावा (वडील, आई अगर जे कोणी देवाने तुम्हावर नेमलेले अधिकारी असतील), द्वेष किंवा खून करायचा नाही, वासना धरायची नाही किंवा व्यभिचार करायचा नाही, चोरी करायची नाही, लबाडी करायची नाही आणि देवाने मना केलेल्या कोणत्याही गोष्टीचा लोभ धरायचा नाही (निर्गम २०:१-१७). जेव्हा कोणीतरी येशूला प्रश्न केला की सर्वांत मोठी आज्ञा कोणती तेव्हा त्याने उत्तर दिले, "तू आपला देव परमेश्वर ह्याच्यावर पूर्ण अंत:करणाने, पूर्ण जिवाने व पूर्ण मनाने प्रीती कर. हीच मोठी व पहिली आज्ञा आहे . हिच्यासारखी दुसरी ही आहे की तू आपल्या शेजाऱ्यावर स्वत: सारखी प्रीती कर" (मत्तय २२:३७-३९).

देवाच्या वचनानुसार त्याच्या आज्ञा मोडल्याबद्दल तुम्ही देवासमोर दोषी ठरत नाही का? या भूतलावर तुमची पोलीसात स्वच्छ नोंद असेल, पण स्वर्गातील तुमची नोंद गुन्हेगाराची आहे.

शिवाय ही समस्या इतकी वाईट होण्याचे कारण तुमची ही नोंद बदलावी म्हणून तुम्ही काहीच करू शकत नाही; केवळ देवच तुमची ही नोंद हाताळू शकतो. तुम्ही स्वर्गाच्या कोर्टात गुप्तपणे जाऊन नोंदींशी उगाच काही खटपट करू शकत नाही. आपली बाह्य नैतिकता किंवा धर्मकृत्ये दाखवून देवाने आपल्याला नरकपात्र ठरवण्यात चूक केली असे म्हणून देवाची भुलवणूक करून गयावया करू शकत नाही. देवाच्या दरबारी लाचलुचपत चालत नाही. पापाची पूर्णपणे भरपाई केली जावी अशी देव अपेक्षा करतो: "पापाचे वेतन मरण आहे" (रोम ६:२३). देवाच्या पवित्र नियमांचे समाधान झाले पाहिजे, नाहीतर देव न्यायी ठरणार नाही.

जर तुम्ही या समस्येला गांभीर्याने सामोरे गेला तर जीवनातील इतर सर्व समस्या तुम्हाला क्षुल्लक दिसू लागतील. तुम्ही देवाला आरोळी माराल व दयेची याचना कराल. शुभवर्तमानात देवाजवळ खरोखरीच दया आहे. शुभवर्तमानात देव आपल्या कृपेने व सार्वभौमत्वाने पाप्याच्या गुन्हेगारीच्या सर्व नोंदी पुसून टाकतो आणि त्यांची पापे वाहून नेणाऱ्या त्याच्या बदलीच्या व्यक्तीला शिक्षा करून त्याची न्यायत्वाची मागणी पूर्ण करतो व समाधान पावतो.

वाईट अंत:करण

पण तुमच्या पेचावर शुभवर्तमानातील उपायाचा विचार करण्यापूर्वी या समस्येच्या दुसऱ्या बाजूचाही विचार करणे गरजेचे आहे. तुमच्या स्वर्गातील नोंदी वाईट आहेतच शिवाय या भूतलावर असताना तुमचे *अंत:करण वाईट* आहे.

देवाचे वचन स्पष्ट जाहीर करते की सर्व मनुष्यांचे अंत:करण वाईट आहे. यिर्मया १७:९ म्हणते "ऱ्हदय सर्वात कपटी आहे, ते असाध्य रोगाने ग्रस्त आहे" उपदेशक ९:३ म्हणते, "मानवपुत्रांच्या मनात दुष्टता भरलेली असते, त्यांचे मन जन्मभर भ्रांतिमय असते."

येशूने स्पष्ट शिकवले की पापाचे मूळ मनुष्याच्या अंत:करणात आहे. तो म्हणाला, "कारण आतून म्हणजे माणसाच्या अंत:करणातून वाईट विचार निघतात. जारकर्मे, चोऱ्या, खून, व्यभिचार, लोभ , दुष्टपणा, कपट, कामातुरपणा, हेवा, शिव्यागाळी, अहंकार, मूर्खपणा. ह्या सर्व वाईट गोष्टी आतून बाहेर निघतात व माणसाला भ्रष्ट करतात" (मार्क ७:२१-२३). बाह्यवातावरणामुळे पापाची निर्मिती होत नाही तर ते मनुष्याच्या वाईट अंत:करणातून बाहेर येते! तुमच्या महान समस्येचा हा दुसरा पैलू आहे: कोडगे, सुधारण्यापलीकडचे, पापावर प्रेम करणारे, देवद्वेष्टे अंत:करण. हे देवाशी शत्रुत्व करते आणि देवाच्या नियमांच्या अधीन नसते व ते अधीन राहूही शकत नाही (रोम ८:७).

कदाचित बायबल सांगते तितके तुम्ही स्वत:ला वाईट समजत नसाल कारण तुमचे अंत:करण *कपटी* आहे. ते केवळ इतरांना नव्हे तर तुम्हालाही फसवण्यात प्रवीण आहे. देवाने दाखवलेल्या तुमच्या अंत:करणाच्या भयानक अवस्थेच्या वर्णनाचा पूर्ण अनादर करून, तुम्ही इतकेच काही वाईट नाही असा विचार तुमच्यापुढे आणून तुमचे अंत:करण तुमची फसवणूक करील. ते तुम्हाला म्हणेल की खोलवर तुम्ही "ठीक" आहात — परिपूर्ण नाही पण "ठीक "आहात. पण हा प्रतिसादच ऱ्हदयाच्या कपटीपणाचा पुरावा असल्याचे तुम्हाला दिसते ना? देवाने प्रकट केलेल्या या सत्याला तुमच्या विवेकभावाने पुष्टी दिली पाहिजे. पण उलट त्या सत्याचा ते विपर्यास करते, ते नाकारते, आणि लबाडीने त्यावर अच्छादन घालते. याखेरीज हे खरे नाही का, की ज्या गोष्टींना देवाने मनाई केली आहे त्याच गोष्टी तुम्हाला कराव्याशा

वाटतात? आणि ज्या गोष्टी देवाने तुम्हाला करायला सांगितल्या आहेत त्यांचाच तुम्ही द्वेष करता आणि त्या गोष्टी तुम्ही करत नाही?

खरी समस्या ही आहे की वाईट अंत:करणाने तुम्ही स्वर्गात कसे राहणार? स्वर्ग तुम्हाला नरकच वाटेल, कारण तेथे तुमच्या पापवासना पूर्ण करणारे तुम्हाला काहीच सापडणार नाही. देवाची आराधना करणे व त्याच्यासाठी जगणे ही तुमची स्वर्गाची जीवनशैली असेल. तुम्ही आपले अंत:करण सतत देवविरोधी व त्याच्या इच्छेच्या विरोधात ठेवले तर तुमच्यासाठी हे कंटाळवाणे, निराशाजनक व क्रोधी करणारे होणार नाही का? शिवाय देव तुम्हाला बंडखोर पापी म्हणून त्याच्या राज्यात मुळीच प्रवेश करू देणार नाही. क्षमा पावून अंत:करण शुद्ध झालेल्यांनाच देव त्याच्या राज्यात आणतो. बंडखोर पाप्यांना व भ्रष्ट अंत:करणाच्या लोकांना तो मुळीच स्वर्गात प्रवेश देत नाही.

आता तुमच्या समस्येचा हा महत्त्वाचा भाग आहे की तुम्ही आपले अंत:करण बदलू शकत नाही. देवाचे वचन म्हणते, "कुशी माणसाला आपली कातडी, चित्याला आपले ठिपके पालटता येतील काय? असे घडेल तरच दुष्टतेला सवकलेल्या तुम्हास चांगले आचरण करता येईल (यिर्मया१३:२३). या प्रश्नातच उत्तर आहे की "नाही." मानव किंवा पशूही आपला वर्ण बदलू शकत नाहीत. तो त्यांचा नैसर्गिक भाग आहे. तसेच वाईट अंत:करणाची माणसे चांगली बनू शकत नाहीत, कारण ते त्यांच्या स्वभावाविरुद्ध आहे. हे खरे आहे की तुम्ही आपले बाह्य वर्तन काहीसे बदलू शकाल पण तुम्ही आपल्या अंत:करणाची वृत्ती बदलू शकत नाही. विवाहबाह्य लैंगिक संबंधांपासून माणूस स्वत:ला दूर राखू शकेल पण आपल्या अंत:करणात त्याला वासना होत राहील. चर्चला जाऊन दशांश देण्याचा माणूस निर्धार करील पण त्याचवेळी अंत:करणाने तो देवापासून फार दूर असेल. एखादी स्त्री निंदा व लबाडी करण्यापासून आपली जीभ आवरून धरील पण अंत:करणातील द्वेष भावनेपासून स्वत:ला राखू शकणार नाही.

तुमच्या महान समस्येचा दुसरा पैलू हा आहे की तुमच्या स्वर्गातील नोंदी वाईट आहेतच व त्या तुम्ही बदलू शकत नाही, शिवाय या भूतलावर तुम्हाला वाईट अंत:करण आहे, तेही तुम्ही बदलू शकत नाही. ही वाईट बातमी तुम्ही ग्रहण करू शकला नाही तर येशू ख्रिस्ताच्या

शुभवर्तमानातील शुभ बातमी तुम्हाला कधीच समजू शकणार नाही. सुवार्ता किंवा शुभवर्तमान म्हणजे चांगली बातमी. जे स्वत: अगदी असहाय असल्याचे व आपण पापी म्हणून अत्यंत दुरावस्थेत असल्याचे जाणून चुकले आहेत अशांसाठीच केवळ ही सुवार्ता उत्तम बातमी आहे.

स्वच्छ नोंदी व बदललेले अंत:करण

पापी लोकसमुहाचे वाईट अंत:करण बदलण्यासाठी व त्यांच्या वाईट नोंदी पुसून टाकण्यासाठी देवाने आपला पुत्र प्रभू येशू ख्रिस्त याच्याद्वारे जे काही केले त्याविषयीची उत्तम बातमी म्हणजे येशू ख्रिस्ताचे शुभवर्तमान होय.

मरण जवळ येऊन ठेपले असताना आपल्या शिष्यांबरोबर शेवटचे भोजन करताना येशू जे काही बोलला त्यावर थोडा विचार करा. तो म्हणाला, "हा प्याला माझ्या रक्तात नवा करार आहे, ते रक्त तुम्हासाठी ओतले जात आहे" (लूक २२:२०). *नवा करार आहे* या तीन शब्दांत येशूने आपल्या येण्याच्या कार्याचा हेतू सारांशाने मांडला आहे. येशूने स्वत: आपले गौरव रिक्त करण्यासाठी जे सर्व काही केले, तो खरोखर मानव होऊन या भूतलावर आला, पापविरहित जीवन जगून त्याने जे काही केले, आपल्या लोकांसाठी बदलीचा पापवाहक कोकरा होऊन आणि आपल्या गौरवी पुनरुत्थानाने जे सर्व काही तो आता करणार होता, त्या सर्व गोष्टी त्याचा हा नव्या करार स्थापन करताना कळसाकडे नेणाऱ्या होत्या.

पण देवाने नव्या करारात कोणते अभिवचन दिले? नव्या कराराचे मर्म देवाच्या वचनात यिर्मया ३१:३१-३४ मध्ये नोंद करून ठेवले आहे. ते असे की, "मी नवा करार करीन...मी आपले धर्मशास्त्र त्यांच्या अंतर्यामी ठेवीन; मी ते त्यांच्या ऱ्हदयपटलावर लिहीन; मी त्यांचा देव होईन व ते माझे लोक होतील...मी त्यांच्या अधर्मांची क्षमा करीन, त्यांचे पाप मी यापुढे स्मरणार नाही."

नवा करारात मुलत: दोन आशीर्वादांचा समावेश होतो. १) देव अभिवचन देतो की तो आपल्या लोकांची पापे व अधर्म यापुढे स्मरणार नाही. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर तो म्हणतो तो त्यांची पापे कायमची पुसून टाकील. त्यांचे पाप यापुढे जमेस धरणार नाही. स्वर्गातील कोर्टात त्याच्या लोकांचे अपराध स्वच्छ झाले आहेत. २) देव

अभिवचन देतो की त्याच्या लोकांच्या अंतर्यामात तो आपले नियम ठेवील व त्यांच्या ऱ्हदयपटलांवर ते लिहील (म्हणजे त्यांच्या मनावर व अंत:करणावर). नव्या करारात देव आपल्या लोकांची अंत:करणे अशा प्रकारे बदलतो की जे त्याचे नियम यापूर्वी द्वेषाने फेटाळले जायचे ते आता त्याच्या लोकांच्या अंत:करणात असतात, यासाठी त्याच्या लोकांना ते हवेहवेसे वाटावेत व त्यांनी त्यांचे पालन करावे. आता देवाला ज्यात आनंद वाटतो त्यातच त्यांना आनंद वाटतो. देवाला ज्या गोष्टी खिन्न करणाऱ्या आहेत त्यांनी तोही खिन्न होतो. शिवाय देवाचे नियम केवळ त्यांना हवेहवेसे वाटावेत म्हणूनच त्यांच्या अंत:करणावर लिहिलेले नसतात तर देव त्यांची भूतलावरील जीवनाची वाटचाल पूर्ण होऊन त्यांचा स्वर्गात प्रवेश होईपर्यंत ते अधिकाधिक पाळण्यास त्यांना सामर्थ्य देतो.

अशा प्रकारे या नव्या करारात, देव जो न्यायाधीश व आपल्या लोकांना नीतिमान ठरवणारा तो स्वत: त्यांच्या नोंदी पुसून टाकतो. तो जिवांचा वैद्य असल्याने त्यांचे पापी अंत:करण बदलून तो त्यांना आरोग्य देतो. उत्तम बातमी ही आहे की नोंदी पुसून टाकण्याची आणि अंत:करण बदलण्याची पूर्ण तरतूद देवाच्या कृपेने येशू ख्रिस्ताद्वारे विश्वासाने जो कोणी देवाकडे येईल त्याच्यासाठी उपलब्ध आहे. तुमच्या महान समस्येवर हा एकमेव उपाय आहे.

समस्या सोडवणे

या साऱ्याचा तुमच्यासाठी काय अर्थ होतो? प्रथम हे लक्षात घ्या की तुमच्या नोंदी अधिक वाईट होऊ नयेत म्हणून तुम्ही आपले जीवन बदलायचा निर्धार करायला हवा असे मुळीच नाही. होय, मुळीच नाही. हा सुवार्तेचा संदेश नाही. जरी तुम्ही आपले जीवन सरळ मार्गी केले, आणि आपल्या स्वर्गातील नोंदींमध्ये आणखी एकाही कलंकाची भर पडू दिली नाही व आपल्या माथ्यावरची रास डोंगराप्रमाणे वाढू दिली नाही, तरीही तुमच्या वाईट नोंदी तुमच्यावर गत काळातील पापांमुळे सतत अनिष्टसूचक सावली पाडत राहातील. तुम्ही आधीच केलेल्या पापाच्या डोंगरावर अधिक पापांची भर न घालण्याने नरकात कोसळण्यापासून तुम्ही स्वत:ला रोखू शकणार नाही. "जीवन सरळ करणे" ही येशू ख्रिस्ताची सुवार्ता नाही.

"तुम्ही ख्रिस्तासाठी जगण्याचा निर्णय घ्या आणि ख्रिस्तामागे चालू लागा" हा देखील ख्रिस्ताचा सुवार्ता संदेश नाही.

वाईट अंत:करणाने तुम्हाला अशी इच्छाही होणार नाही व तुम्ही असे करूही शकणार नाही. हीच तर समस्या आहे. तुमचे वाईट अंत:करण स्वत:लाच संतुष्ट करू पाहते, येशूला नव्हे. तुम्ही जसे आहात तसे ख्रिस्ताला अनुसरू शकत नाही. तुमचे परिवर्तनच झाले पाहिजे. तुमचे अंतर्यामच बदलले पाहिजे. तुम्हाला नवीन अंत:करण प्राप्त झाले पाहिजे!

शिवाय "येशुविषयीच्या काही सत्यांवर विश्वास ठेवणे (उदा. येशू पाप्यांसाठी वधस्तंभावर मरण पावला) आणि मग एक प्रार्थना करणे आणि सर्व काही ठीक झाले असा विश्वास ठेवणे" हा देखील सुवार्तेचा संदेश नव्हे. मुळीच नव्हे. ते सुवार्तेचे पाचारणही नव्हे.

सुवार्तेचा संदेश हा आहे की "येशूकडे या." तो नव्या कराराचा मध्यस्थ आहे (इब्री १२:२-४). त्याच्याकडे येण्यामध्ये नव्या कराराचे आशीर्वाद प्राप्त होतात. तुमचे तारण करावे म्हणून ख्रिस्ताचा धावा करा. तुम्ही त्याच्याविरुद्ध बंडखोरी केली असल्याचे जाणा, अगणित वेळा तुम्ही त्याचे नियम मोडले असल्याचे कबूल करा, आणि वचन सांगते त्याप्रमाणेच तुम्ही अत्यंत वाईट असल्याचे व नरकाला जाण्यास पात्र असलेला पापी आहात हे मान्य करा. स्वत:ला येशू ख्रिस्तावर व त्याच्या दयेवर सोपवून द्या. खरेपणाने जे त्याचा धावा करतात अशा सर्वांसाठी त्याने नव्या कराराची जी अभिवचने दिली आहेत त्या सर्वांचे फायदे तुम्हालाही मिळावेत म्हणून त्याची याचना करा. तुमच्या नोंदी पुसून टाकल्या जाव्यात व तुम्हाला नवीन अंत:करण प्राप्त व्हावे म्हणून त्याला मागणी करा.

येशूने म्हटले, "अहो कष्टी व भाराक्रांत जनहो, तुम्ही सर्व माझ्याकडे या म्हणजे मी तुम्हाला विसावा देईन" (मत्तय११:२८). जर तुम्ही आपल्या वाईट नोंदींच्या भाराने व तुमच्या वाईट अंत:करणाच्या असहायतेमुळे दडपलेले आहात तर तुमची समस्या सोडवण्यासाठी ख्रिस्ताकडे जा, तो तुम्हाला विसावा देईल. एकटा येशू ख्रिस्तच नव्या कराराचे सर्व फायदे तुम्हाला लागू करू शकतो. त्यासाठी केवळ तोच मध्यस्थ आहे. सुवार्तेचा संदेश "वेदीसमोर या" हा नाही. "चौकशी कक्षाकडे या" असाही नाही. "सेवकाकडे या" असाही नाही. ही सर्व बाह्य कृती झाली.

सुवार्तेचा संदेश आहे की, "केवळ विश्वासाने ख्रिस्ताकडे या." ही आध्यात्मिक कृती होय. ख्रिस्ताने तुमची क्षमा करावी व तुम्हाला नवीन अंत:करण द्यावे म्हणून त्याला हाक मारा.

ही गोष्ट लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की जेव्हा देव पाप्याचे तारण करतो तेव्हा तो नव्या कराराच्या दोन्ही आशीर्वादांचा त्याच्यावर वर्षाव करतो. *जर तुम्हाला देवाच्या नियमात आनंद वाटत नसेल आणि त्यांचे पालन करण्याचा प्रयत्न करावासा वाटत नसेल तर तुमच्या नोंदी पुसल्या गेल्याच्या भ्रमात राहू नका. असे होऊ शकत नाही.* देव एका आशीर्वादाशिवाय दुसरा आशीर्वाद वर्षू शकत नाही. पाप्याचे ऱ्हदय न बदलता तो पाप्याच्या नोंदी पुसून टाकू शकत नाही. आत्म्याला घातक असा खोटा विश्वास असा सांगतो की तुम्ही वाईट नोंदींपासून तारण पावला आहात म्हणून स्वर्गाला चालला आहात. आता न बदललेल्या अंत:करणाने तुम्ही देवाच्या इच्छेचा आदर न करता आज्ञा मोडणारे जीवन जगू शकता. जर देवाने तुमच्या मनात पापाविषयी द्वेश निर्माण केला नसेल (सर्व पाप केवळ काही पापे नव्हे), आणि सर्व पापाचा त्याग करण्याचा तुमचा निर्धार नसेल, तर तुम्ही फसवत आहात आणि अजूनही तुमचे अंत:करण वाईटच आहे. तुमच्या मूर्ख कल्पनांबद्दल देवाकडे क्षमेची याचना करून त्याने तुमचे अंत:करण बदलावे म्हणून प्रार्थना करा.

ख्रिस्त जो नव्या कराराचा मध्यस्थ, तोच केवळ तुमच्या या महान समस्येवरील उपाय आहे. देवाने तुमची ही समस्या हाताळली आहे का? ख्रिस्ताच्या बदलीच्या मरणाने देवाने तुमची पापे पुसून टाकल्याची व तुमच्या वाईट नोंदी स्वच्छ केल्याची तुम्हाला खात्री दिली आहे का? तुम्हाला देवाने नवीन अंत:करण दिल्याचे तुमच्या जीवनावरून दिसून येते का? असे नसेल तर ख्रिस्ताला प्राप्त करण्याची इच्छा धरा. नव्या कराराचा मध्यस्थ जो येशू त्याचा धावा करा. त्याच्या दयेची याचना करा. येशूच्या चरणाशी येऊनही दया प्राप्त झाली नाही म्हणून कोणाचा नाश झाला असे कदापि झाले नाही. तुमची पापे जितकी व्यापक असतील तितकी त्याची दयाही व्यापक आहे. पण लक्षात ठेवा: ती कुठेच नव्हे तर फक्त त्याच्या चरणापाशीच मिळते.